# जिल्हा परिषद, गडचिरोली

## जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील आरोग्य विभागाशी संबधित गट-क मधील सरळ सेवेची रिक्त पदे भरणेबाबत

## -:-शुध्दीपत्रक-:-

**जिल्हा परिषद,गडचिरोली अंतर्गत आरोग्य विभागांशी संबधित गट-क मधील सरळसवेतील रिक्त पदे भरण्याकरीता माहे मार्च 2019 नुसार जाहीरात क्रमांक 2712/2021 दिनांक 25/08/2021 नुसार जाहीरात प्रकाशित करण्यात आलेली होती.जाहीरातीमधील विवरणपत्र-अ मधील मुददा क्रमांक 5 खालील प्रमाणे आहे.**

मार्च 2019 च्या जाहीराती नुसार ऑनलाईन परिक्षेकरीता उमेदवारांना एक किवा एका पेक्षा जास्त जिल्हा परिषदा साठी अर्ज करण्याची मुभा होती.तथापी आता शासनाचे महा परिक्षा पोर्टल रदद झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबधित पद भरती ही OMR Vendor मार्फत Offline पध्दतीने राबविण्यात येणार असल्याने उपरोक्त पाच संवर्गातील प्रत्येक संवर्गाची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदा मध्ये एकाच दिवशी आयोजीत करण्यात येणार आहे.त्यामुळे उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदा मध्ये मधुन परिक्षा देता येईल.या साठी ज्या उमेदवारांनी एका पेक्षा जास्त जिल्हा परिषदामध्ये रिक्त पदाकरीता अर्ज केले आहेत,अशा उमेदवारांनी परिक्षेकरीता एकाच जिल्हा परिषदेचा विकल्प वरील प्रमाणे नमुद संकेतस्थळावर दिनांक 1 संप्टेबर 2021 ते 14 संप्टेबर 2021 या कालावधीत नोंदविणे आवश्यक राहील.

**याऐवजी**

महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग मुबंई शासन शुध्दीपत्रक क्रमांक संकीर्ण-2020/प्र.क्र.99/आस्था-8 दिनांक 1 संप्टेबर 2021 अन्वये "माहे मार्च 2019 च्या जाहीरातीनुसार ऑनलाईन परिक्षेकरीता उमेदवारांना एक किवा एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदामधील एक किंवा अधिक संवर्गातील पदासाठी अर्ज करण्याची मुभा होती.तथापि, आता शासनाचे महापरिक्षा पोर्टल रदद झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबधित पद भरती ही OMR Vendor मार्फत Offline पध्दतीले राबविण्यात येणार असल्याने उपरोक्त् पाच संवर्गाची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिक्षामध्ये एकाच दिवशी आयोजीत करण्यात येणार आहे.त्यामुळे उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदामध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहुन परिक्षा देता येणार आहे.तथापि पाच संवर्गाच्या पद भरती संदर्भात घेण्यात येणा-या परिक्षेसाठीच्या प्रत्येक संवर्गाची प्रश्नपत्रिका सर्व जिल्हा परिषदासाठी संवर्ग निहाय सामायिक राहणार आहे.त्यामुळे सन 2019 च्या जाहीरातीनुसार ज्या उमेदवारांनी एक किंवा एकापेक्षा अधिक संवर्गाच्या परिक्षेसाठी एकापेक्षा अधिक जिल्हा परिषदामधुन अर्ज भरलेले आहेत त्या उमेदवारांचे सर्व ठिकाणी भरलेले अर्ज ग्राहय धरले जातील.अशा उमेदवारांना बाबत त्यांने प्रत्यक्ष एकाच जिल्हा परिषदे अंतर्गत आयोजीत परिक्षेस उपस्थित राहुन परिक्षा दिल्यानंतर सदर परिक्षेमध्ये त्याला प्राप्त होणा-या गुणांच्या आधारे त्यांने ज्या-ज्या जिल्हा परिषदेतुन सदर पदभरतीसाठीअर्ज भरला आहे.त्या-त्या जिल्हा परिषदांच्या सदर पदांकरीताच्या तयार होणा-या गुणवत्ता (प्रवर्ग निहाय) यादीमध्ये त्यांचे नाव गुणवत्ता क्रमांकानुसार अंतर्भुत केले जाहील.

तसेच,नव्याने समाविष्ठ झालेले दिव्यांग प्रवर्ग व खुल्या प्रवर्गात नव्याने वाढ झालेल्या रिक्त जागासाठी प्रसिध्द होणा-या जाहीरातीनुसार परिक्षेला बसु इच्छिना-या उमेदवाराला विभागाच्या दिनांक 23/07/2018 च्या शासन निर्णयानुसार एक किंवा एकापेक्षा अधिक जिल्हा परिषदामध्ये पदासाठी अर्ज करता येईल.तसेच एका उमेदवारांला एका किंवा अनेक संवर्गातील पदासाठी अर्ज करण्याची मुभा राहील.परंतु प्रत्येक पदासाठी त्याला स्वतंत्र परिक्षा शुल्क आकारले जाहील.तसेच उमेदवारांने परिक्षेसाठी उपस्थित राहण्याकरीता जिल्हा परिषदेचा विकल्प देणे आवश्यक आहे.याबाबत www.maharddzp.com या संकेतस्थळावर जाउन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.त्याप्रमाणे उमेदवारास प्रवेशपत्र पाठविण्यात येईल.तसेच सदर उमेदवाराबाबतही परिक्षा व गुणवत्तायादी बाबतही कार्यपध्दती वरील परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे राहील," असे वाचावे.

तसेच जाहीरातीमधील विवरणपत्र अ मधील मुददा क्रमांक 8 रदद करण्यात येत आहे.व अर्ज करण्याची पध्दतीमधील मुददा क्रमांक 3 मधुन " एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदामध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदवरामधुन जिल्हयाचा विकल्प घेणे " हि बाब वगळण्यात येत आहे. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

कुमार आशिर्वाद (भा.प्र.से)
सदस्य जिल्हा निवड समिती
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, गडचिरोली

संजय मीना (भा.प्र.से)
अध्यक्ष जिल्हा निवड समिती
तथा जिल्हाधिकारी गडचिरोली

सदस्य सचिव जिल्हा निवड समिती,
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद,गडचिरोलीकरीता

फरेंद्र कुत्तीरकर
सदस्य जिल्हा निवड समिती,
तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि)
जिल्हा परिषद,गडचिरोली

# जिल्हा परिषद, गडचिरोली

## जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील आरोग्य विभागाशी संबधित गट-क मधील सरळ सेवेची रिक्त पदे भरणेबाबत

## -:-शुध्दीपत्रक-:-

जिल्हा परिषद,गडचिरोली अंतर्गत आरोग्य विभागांशी संबधित गट-क मधील सरळसवेतील रिक्त पदे भरण्याकरीता माहे मार्च 2019 नुसार जाहीरात क्रमांक 2712/2021 दिनांक 25/08/2021 नुसार जाहीरात प्रकाशित करण्यात आलेली होती. महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग मुबंई शासन शुध्दिपत्रक क्रमांक संकीर्ण-2020/प्र.क्र.99/आस्था-8 दिनांक 1/9/2021 नुसार जाहीरातीतील शुध्दीपत्रक **www.maharddzp.com** व www.zpgadchiroli.org व www.zpgadchiroli.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

सदस्य सचिव जिल्हा निवड समिती,
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद,गडचिरोली करीता

संजय मीना (भा.प्र.से)
अध्यक्ष जिल्हा निवड समिती
तथा जिल्हाधिकारी गडचिरोली